महसूल व वन विभागाच्या अधिपत्याखालील नोंदणी व मुद्रांक विभागातील पदे वर्ग करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः आस्थाप-२०२३/११३५/प्र.क्र.२३९/मुद्रांक-१,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक**
**मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२.**
**दिनांकः- २३ एप्रिल, २०२६.**

वाचा :-१) शासन निर्णय क्रमांकः आस्थाप-२०२३/११३५/प्र.क्र.२३९/मुद्रांक-१, दि.४/१२/२०२५.
२) शासन पुरकपत्र क्रमांकः आस्थाप-२०२३/११३५/प्र.क्र.२३९/मुद्रांक-१, दि.९/४/२०२६.
३) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. का-७/आस्था-४/ आकृतीबंध /त्रुटी/२०२६/४४७.दि.२३.०२.२०२६.
४) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि.२/६/२०१५.

**प्रस्तावना :-**

महसूल व वन विभागाच्या अखत्यारीतील, नोंदणी व मुद्रांक विभागाच्या जुन्या आकृतीबंधानुसार मंजूर ३०९४ पदांपैकी १०७ पदे निरसित करून व ९६५ पदे नव्याने निर्माण करून एकूण ३९५२ पदांचा आकृतीबंध संदर्भ क्र.१ येथील दि.४/१२/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारीत करण्यात आला आहे. तद्नंतर, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांनी उपलब्ध करून दिलेल्या माहितीनुसार, सुधारीत आकृतीबंधाचा कार्यालय निहाय पदांचा तपशील संदर्भ क्र.२ येथील दि.९/४/२०२६ रोजीच्या पुरकपत्रान्वये मंजूर करण्यात आला.

नोंदणी व मुद्रांक विभागाच्या सुधारीत आकृतीबंधानुसार, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालयातील सर्व तांत्रिक स्वरूपाची पदे निरसित करण्यात आली असल्याने उर्वरित अतांत्रिक पदे इतरत्र वर्ग करणे आवश्यक असल्याचे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांच्या निदर्शनास आले. याकरीता, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयातील पदांचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार ६० पदांचे कार्यालयांतर्गत वर्ग करण्याची विनंती संदर्भ क्र.३ येथील दि.२३/२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाली आहे. यानुसार, सदर पदे वर्ग करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

वित्त विभागाच्या संदर्भ क्र.४ येथे नमूद दि.२/६/२०१५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये, प्रशासकीय विभागाला प्रशासनावर कोणताही विपरीत परिणाम न होता, विभागामध्ये एकूण उपलब्ध कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याचे संपूर्ण अधिकार राहतील अशी तरतूद आहे.

**शासन निर्णयः-**

नोंदणी व मुद्रांक विभागातील, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालयातील सर्व तांत्रिक स्वरूपाची पदे निरसित करण्यात आली असल्याने उर्वरित अतांत्रिक (सहायक लेखाधिकारी/ वरिष्ठ लिपिक/कनिष्ठ लिपिक/ शिपाई इ.) पदे तसेच इतर कार्यालयातील आवश्यकतेनुसार पदे वर्ग करण्याची आवश्यकता विचारात घेऊन, पुढील तक्तयात नमूद ६० पदे वर्ग करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| वर्ग करावयाच्या पदांचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **पदनाम** | **पद संख्या** | **ज्या कार्यालयातुन पद वर्ग करावयाचे आहे त्या कार्यालयाचे नांव** | **ज्या कार्यालयात पद वर्ग करावयाचे आहे त्या कार्यालयाचे नांव** |
| १ | **सहाय्यक लेखाधिकारी** | १ | शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय - १ पद | नोंदणी महानिरीक्षक कार्यालय --१ पद |
| २ | **उपलेखापाल** | ८ | विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक, कार्यालय मुंबई -१ पद | सहजिल्हा निबंधक वर्ग १ कार्यालय, मुंबई शहर - १ पद |
| | | | विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक, कार्यालय ठाणे - १ पद | सहजिल्हा निबंधक वर्ग १ कार्यालय, ठाणे शहर- १ पद |
| | | | विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक, कार्यालय पुणे - १ पद | सहजिल्हा निबंधक वर्ग १ कार्यालय, ठाणे शहर- १ पद |
| | | | विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक, कार्यालय नाशिक -१ पद | सहजिल्हा निबंधक वर्ग १ कार्यालय, नाशिक - १ पद |
| | | | विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक, कार्यालय छत्रपती संभाजीनगर - १ पद | सहजिल्हा निबंधक वर्ग १ कार्यालय, छत्रपती संभाजीनगर - १ पद |
| | | | विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक, कार्यालय लातुर - १ पद | सहजिल्हा निबंधक वर्ग १ कार्यालय, लातुर - १ पद |
| | | | विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक, कार्यालय अमरावती - १ पद | सहजिल्हा निबंधक वर्ग १ कार्यालय, अमरावती -१ पद |
| | | | विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक, कार्यालय नागपूर - १ पद | सहजिल्हा निबंधक वर्ग १ कार्यालय, नागपूर शहर - १ पद |
| ३ | **वरिष्ठ लिपीक** | २ | दुय्यम निबंधक कार्यालय पूर्णा-जि.परभणी - १ पद | सहजिल्हा निबंधक वर्ग १ कार्यालय, परभणी - १ पद |
| | | | सह दुय्यम निबंधक कार्यालय भिवापूर येथील वरिष्ठ लिपिक-- १ पद | सहजिल्हा निबंधक वर्ग १ कार्यालय, नागपूर ग्रामीण - १ पद |
| ४ | **कनिष्ठ लिपीक** | २७ | शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालयातील कनिष्ठ लिपिक- ९ पदे | नोंदणी महानिरीक्षक कार्यालयात-- ९ पदे |
| | | | सह दुय्यम निबंधक कार्यालय हवेली क्र.१ येथील कनिष्ठ लिपिक-- ५ पदे | नव्याने प्रस्तावित मध्यवर्ती अभिलेखकक्ष कार्यालयात¬५ पदे |
| | | | सह दुय्यम निबंधक कार्यालय हवेली क्र.२ येथील कनिष्ठ लिपिक- ४ पदे | नव्याने प्रस्तावित मध्यवर्ती अभिलेखकक्ष कार्यालयात---४ पदे |
| | | | सह दुय्यम निबंधक कार्यालय तासगांव येथील कनिष्ठ लिपिक-- १ पद . | सह दुय्यम निबंधक मिरज-१ |
| | | | सह दुय्यम निबंधक हातकणंगले येथील कनिष्ठ लिपिक संवर्गातील ३ पदांपैकी १ पद | सह दुय्यम निबंधक करवीर-२ |
| | | | सह दुय्यम निबंधक माळशिरस येथील कनिष्ठ लिपिक संवर्गातील ३ पदांपैकी १ पद | सह दुय्यम निबंधक सोलापूर उत्तर क्र.१ (मुख्यालय)---१ पद |
| | | | सह दुय्यम निबंधक निलंगा येथील कनिष्ठ लिपिक-- १ पद | सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय लातूर¬१ पद |
| | | | सह दुय्यम निबंधक अहमदपूर येथील कनिष्ठ लिपिक--१ पद | सह दुय्यम निबंधक लातूर-१ |
| | | | सह दुय्यम निबंधक निफाड क्र.१ येथील कनिष्ठ लिपिक-- १ पद | सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक¬१ पद |
| | | | सह दुय्यम निबंधक पैठण येथील कनिष्ठ लिपिक संवर्गाचे ३ पदांपैकी १ पद | सह दुय्यम निबंधक छत्रपती संभाजीनगर क्र.२ -----१ पद |
| | | | सह दुय्यम निबंधक गेवराई येथील कनिष्ठ लिपिक संवर्गाचे ३ पदांपैकी १ पद | सह दुय्यम निबंधक बीड-१---१ पद |
| | | | सह दुय्यम निबंधक अंबड येथील कनिष्ठ लिपिक संवर्गाचे ३ पदांपैकी १ पद | सह दुय्यम निबंधक जालना-१--१ पद |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | **वाहन चालक** | १ | प्रधान मुद्रांक कार्यालय- वाहनचालक - १ पद | नोंदणी महानिरीक्षक कार्यालयात–१ पद |
| ६ | **दफ्तरबंद** | ८ | दु.नि.ठाणे-१ या कार्यालयातील १ पद | सह जिल्हा निबंधक कार्यालय, ठाणे शहर--१ पद |
| | | | सह दुय्यम निबंधक कार्यालय हवेली क्र.२ येथील-१ पद | नव्याने प्रस्तावित मध्यवर्ती अभिलेखकक्ष कार्यालयात -१ पद |
| | | | दु.नि.बुलढाणा (मुख्यालय) या कार्यालयातील-१ पद | सह जिल्हा निबंधक कार्यालय, बुलढाणा--१ पद |
| | | | दु.नि. करवीर क्र.१ या कार्यालयातील १ पद. | सह जिल्हा निबंधक कार्यालय, कोल्हापूर-- १ पद |
| | | | सोलापूर उत्तर क्र.१ (मुख्यालय) या कार्यालया मधील १ पद. | सह जिल्हा निबंधक कार्यालय, सोलापूर--१ पद |
| | | | दु.नि. नाशिक क्र.१ या कार्यालयातील १ पद. | सह जिल्हा निबंधक कार्यालय, नाशिक-१ पद |
| | | | दु.नि. अहिल्यानगर क्र.१ या कार्यालयातील १ पद. | सह जिल्हा निबंधक कार्यालय, अहिल्यानगर-१ पद |
| | | | दु.नि. अमरावती क्र.१ या कार्यालयातील १ पद. | सह जिल्हा निबंधक कार्यालय, अमरावती- १ पद |
| ७ | **शिपाई** | ११ | शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालयातील ३ पदे | नव्याने प्रस्तावित सह जिल्हा निबंधक वर्ग १ , पुणे उपनगर (पिंपरी चिंचवड महानगरपालीका क्षेत्र) या कार्यालयात-- शिपाई संवर्गातील ३ पदे |
| | | | शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालयातील २ पदे | सह जिल्हा निबंधक कार्यालय, पुणे ग्रामीण--२ पदे |
| | | | सह जिल्हा निबंधक कार्यालय, अहिल्यानगर, अमरावती, सोलापूर व कोल्हापूर येथे शिपाई संवर्गाची ४ पदे मंजुर असुन त्यापैकी प्रत्येकी १ पद<br>अशी एकूण ४ पदे. | पुणे विभागातील सजिनि पुणे शहर येथील नव्याने प्रस्तावित मध्यवर्ती अभिलेख कक्षात शिपाई संवर्गाची ४ पदे वर्ग करणेस प्रस्तावित. |
| | | | सह जिल्हा निबंधक कार्यालय, नाशिक येथे शिपाई संवर्गातील मंजूर ४ पदांपैकी १ पद | पुणे विभागातील सह जिल्हा निबंधक कार्यालय, पुणे शहर येथील नव्याने प्रस्तावित मध्यवर्ती अभिलेख कक्षात–१ पद. |
| | | | सह जिल्हा निबंधक कार्यालय, बुलढाणा येथे शिपाई संवर्गातील मंजूर ४ पदांपैकी १ पद | पुणे विभागातील सजिनि पुणे शहर येथील नव्याने प्रस्तावित मध्यवर्ती अभिलेख कक्षात-१ पद |
| ८ | **पहारेकरी** | १ | शा.छा.नोंदणी कार्यालयातील - १ पद. | नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे |
| ९ | **माळी** | १ | शा.छा.नोंदणी कार्यालय--१ पद. | नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे |
| | **एकूण** | ६० | | |

सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या दि.२/६/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४२३१३३७०१७०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमीत करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ

Digitally signed by SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=559498df564ab1121a356349085c1b8e3cc0f12569ba0f7f209 0386d4dccb333, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F7145AF5949FB706E2DCB06C2B209B58FFA369F6E085 E02041722C90F0528791, cn=SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
Date: 2026.04.23 13:37:53 +05'30'

**( सत्यनारायण बजाज )**
**सह सचिव (मुद्रांक)**

**प्रत :-** १. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
२. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, महाराष्ट्र, मुंबई
५. खाजगी सचिव, मा. मंत्री (महसूल) व मा. राज्यमंत्री (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६.नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे,
८. निवडनस्ती (आस्थापना).